स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
|| स्वच्छतेचा ध्यास धरा, आरोग्याचा मंत्र खरा ||
# ग्रामपंचायत बोरफळ
ता.औसा, जि.लातूर ४१३५२० (महाराष्ट्र)
सौ.सुरेखा बजरंग जमादार
सरपंच
श्री.धनराज भैरोबा रावते
उपसरपंच
सशक्त पंचायत सतत् विकास
* घरपट्टी व पाणीपट्टी वेळेत भरुन सहकार्य करा.
* बालविवाह टाळा कुटुंब नियोजन करा.
* घरोघरी शौचालय बांधा व नियमित वापर करा.
* पाणी उकळून व गाळून पिणे आरोग्यास हितकारक आहे.
* आपला परिसर स्वच्छ ठेवा. * आपले आरोग्य आपल्या हाती.
* जन्म, मृत्यू, विवाह नोंद २१ दिवसाचे आत ग्रा.पं. मध्ये करा.

ग्रामपंचायत कार्यालय बोरफळ ता.औसा जि.लातूर

आज दि. 26.01.2024 रोजी सकाळी ठीक 10.00 वा मौ. बोरफळ ता. औसा जि. लातूर ची ग्रामसभा ही पुर्वसुचनेनुसार सरपंच सौ. सुरेखा बजरंग जमादार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

विषय क्र. ७ बालविवाह मुक्त, बाल अत्याचार मुक्त व बालमजुरीमुक्त गाव करणे बाबत.

ठराव क्र. ७ -सदरील सभेत सुचकांनी असे सुचविले की, मौ. बोरफळ ता. औसा जि. लातूर येथे कैलास सत्यार्थी चिल्ड्रन्स फाऊंडेशन यांच्या अंतर्गत आपल्या गावामध्ये लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर जि. लातूर हि संस्था बालविवाह मुक्त गाव, बाल अत्याचार मुक्त गाव, बाल मजुरीमुक्त गाव करण्यासाठी खुप चांगल्या प्रकारे काम करत आहेत. या संस्थेमध्ये वरिल विषयाबाबत कायद्याची माहिती मिळाली त्यामुळे आपले गाव बालविवाह मुक्त गाव करण्याचा ठराव पास केला. त्याचबरोबर यापुढे 18 वर्षाखालील आतील मुलींचे व 21 वर्षातील आतील मुलांचा विवाह आपल्या गावात न करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

सुचक :- श्री. नागनाथ हणमंत साळुंके
अनुमोदक :- श्री. राजेंद्र नारायण यादव

सत्यप्रत

सरपंच ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत बोरफळ ता.औसा जि.लातूर